# धनोजे कुणबी विकास संस्था, मुंबई

**रजि.नं.अेफ/२७९३३/ठाणे**

## नमस्कार

धनोजे कुणबी समाजातील होतकरू, गरीब विद्यार्थी, समाजबांधवांना मदत व्हावी, या उद्देशाने धनोजे कुणबी विकास संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

यूपीएससी, एमपीएससीमध्ये आजही समाजातील विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे. काहींना योग्य मार्गदर्शन मिळत नाही तर काहींना राहण्याची सोय उपलब्ध नसते. अनेक वेळा मुंबईसारख्या शहरामध्ये विद्यार्थ्यांना राहता येत नसल्याने आपले करिअर सोडावे लागते. अशा विद्यार्थ्यांना राहण्याची सोय उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेने प्रयत्न सुरू केले असून त्यासाठी प्रत्येक सदस्य कामाला लागले आहेत.

मुंबईमध्ये आपल्या समाजाचे एक भवन असावे, असे प्रत्येक नागरिकाला वाटते. मात्र त्यासाठी आजपर्यंत कुठेही प्रयत्न झालेले नाहीत. इतर समाजाचे मोठमोठे भवन, हॉस्टेल बघून हेवा वाटतो. त्यामुळे गाव, शहरातून मुंबईत आल्यानंतर आपल्या समाजबांधवांना राहण्यासाठी हक्काची जागा उपलब्ध करून देण्यासाठी संस्था प्रयत्न करीत असून समाजबांधवांचेही योगदान असणे तितकेच महत्त्वाचे आहे.

इतर समाजाच्या तुलनेमध्ये आपल्या समाजामध्ये उद्योजक कमी आहेत. पारंपरिक व्यवसायात अनेक जण आजही आपला उदरनिर्वाह करीत आहे. त्यांच्या या पारंपरिक व्यवसायाला कुठेही धक्का लागू न देता त्यांना विविध उद्योगधंद्याच्या माध्यमातून थेट मुंबई, पुणेसारख्या शहरांमध्ये मार्केट उपलब्ध करून देणे, व्यावसायिक नागरिक बनविणे, उद्योग निर्माण करून देण्यासाठी आता संस्थेने मुंबई, पुणे तसेच देश-विदेशातील समाजबांधवांच्या मदतीने गावपातळीवरील समाजबांधवांना मदत करण्याचे धोरण आखले आहे.

मुंबईत राहताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. बोटावर मोजण्याइतकेच समाजबांधव आज मुंबईत वास्तव्यास आहेत. आपल्या कुटुंबापासून, समाजापासून दूर असल्याने मुंबईत आपले लोक एकत्र यावेत, सुख-दुःखात सहभागी होता यावे, एकमेकांना धीर देता यावा यासाठी संस्थेने विविध कार्यक्रम सुरु केले आहेत. अनेक वेळा एका गावातील असतानाही वर्षानुवर्षे त्यांना भेटता येत नाही. त्यामुळे संस्थेने सहल, हळदीकुंकू, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून विखुरलेल्या आपल्या समाजबांधवांना एकत्र आणले आहे. आणखीही काही समाजबांधवांसोबत जुळता आले नाही. मात्र प्रत्येकापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न आहे.

मुंबईच नाही, तर पुणे आणि राज्यातील इतर शहरांतील समाजबांधवांना संस्थेचे सदस्य बनवून एकूणच समाजाच्या विकासाच्या या धाग्यामध्ये सहभागी होण्याची विनंती करण्यात आली आहे.

मुंबईत हॉस्टेल बांधण्यासाठी मोठी आर्थिक गरज आहे. यासाठी शासकीय मदत घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. मात्र यासाठी सदस्य संख्या जास्तीत जास्त असणे गरजेचे आहे. किमान पाच हजारांवर सदस्यसंख्या बनविणे गरजेचे असून याशिवाय आपलाल्या मुंबईत समाजभवन, हॉस्टेल बांधता येणार नाही. त्यामुळे आपल्या कुटुंबातील प्रत्येकाने धनोजे कुणबी विकास संस्थेसोबत जुळून देशाच्या आर्थिक राजधानीत आपल्या समाजाच्या हक्काचे होस्टेल,समाजभवन बांधण्यासाठी सहकार्य अपेक्षित आहे.

विशेषः महिलांना विशेष प्राधान्य मिळावे, त्यांचे नेतृत्वगुण समाजाच्या कामात यावे, यासाठी संस्थेने महिला सदस्यांना अध्यक्ष तसेच विविध समित्यांवर काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. महिला पदाधिकारी, सदस्यही मोठ्या हिरिरीने समाजासाठी काम करीत असून त्यांचे कार्य अतुलनीय आहे.

तसेच विविध समित्यांची निर्मिती करण्यात आली असून त्यांच्या माध्यमातून कार्य सुरु आहे. लवकरच समाजाची बेवसाईट तयार होणार असून या माध्यमातून समाजबांधव एकमेकांशी संवाद साधू शकतील. एवढेच नाही, तर डॉक्टर, वकील, उद्योजक, शेतकरी, प्रशासकीय सेवेतील सर्व बांधवांची यामध्ये माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



### अधिक माहितीसाठी संपर्क

सदस्य
महादेव पिंपळकर
९९२३४०६४५६
अरुण गोहोकर
९७६५०५१३३३
मोनाली बदकी
९८३३७४७९२७
अभय अतकरे
७४०००४५६३९
अक्षय बोथले
९०२९३८२२५०
कृष्णा कानफाडे
९८९२४७०४३०
विकास विभागः- प्रभाकर दिवसे
९१६८८७८६९४
मिडीया विभागः-साईनाथ कुचनकार
९९६०११७१३२
आय. टी. विभागः- अशिश ठाकरे
९०२९१४२००१
विकास विभागः- विलास राजुरकर
९८६९७०९८३२

सभासद शुल्क ५०००/- रुपये

- आर्थिक राजधानी मुंबईत धनोजे कुणबी समाजाचे हॉस्टेल हवे आहे?
- मुंबईत राहण्यासाठी हक्काचे समाजभवन पाहिजे तर, मग आजच सदस्य व्हा.
- आपले सदस्यत्व समाजातील हजारो बेरोजगार, गरीब विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवू शकते.
- धनोजे कुणबी विकास संस्था, आपल्याला निमंत्रित करीत आहे.

### येथे जमा करा सभासद शुल्क

**संस्थेचे नाव** : धनोजे कुणबी विकास संस्था
**बँक** : सेंट्रल बँक ऑफ इंडिया
**ब्रॅण्च** : विक्रोळी (प.), मुंबई
बचत खाते क्रमांक : 3209365590
IFSC Code : CBIN0282930
MICR COD : 400016078

सभासद शुल्क भरल्याची पोच ८१०८३४४६४४ ला कळवा.

* विनीत *

| करिश्मा उदय दुर्गे, | उल्हास ठाकरे | दत्तु पावडे | प्रशांत आगलावे | माधुरी उरकुडे |
|---|---|---|---|---|
| अध्यक्षा | उपाध्यक्ष | सचिव | कोषाध्यक्ष | सहसचिव |
| ८५५२०९०७७७ | ९९३०५३२१२४ | ९९३०७४६०२४ | ८१०८३४४६४४ | ९८२०५९२००७ |

BGS - 8424826363